

कोल्हापुरात डॉ. व्ही. टी. पाटील स्मृतिभवनात रविवारी राहुल फुटाणे यांना 'ताराराणी आदर्श शिक्षक पुरस्कारा'चे वितरण कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्राजक्त पाटील, डॉ. एस. एन. पवार, प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे, प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील उपस्थित होते.

# पारतंत्र्यातील गोष्टी आजच्या व्यवस्थेसाठी घातक : शिंदे

## राहुल फुटाणे यांना 'ताराराणी आदर्श पुरस्कार' प्रदान

कोल्हापूर : स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही अजून पारतंत्र्यातील गोष्टींचे अनुकरण होत आहे. हे आजच्या शिक्षणासह अन्य व्यवस्थांसाठी घातक आहे. यासाठी स्वातंत्र्याची नवी व्याख्या मांडावी लागेल, असे परखड मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी येथे व्यक्त केले.

ताराराणी विद्यापीठ व मौनी विद्यापीठाचे संस्थापक कै. डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या २१ व्या स्मृतिदिनी राजारामपुरीतील डॉ. व्ही. टी. पाटील स्मृतिभवनात राहुल कृष्णात फुटाणे (कुमारभवन हायस्कूल, कडगाव, ता. भुदरगड) यांना 'ताराराणी आदर्श शिक्षक पुरस्कारा'चे वितरण कुलगुरु डॉ. शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे (सातारा), व्ही. पी. निकम-पाटील, प्राजक्त पाटील; डॉ. एस. एन. पवार, प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील उपस्थित होते.

डॉ. शिंदे म्हणाले, शिक्षण संस्था कशा चालवायच्या याचा आदर्श कै. व्ही. टी. पाटील यांनी घालून दिला आहे. काळाच्या पुढे जाऊन त्यांनी मुलींसाठी ताराराणी विद्यापीठाची स्थापना केली. त्यांनी फुले-शाहू-आंबेडकरांचे विचारांची जोपासना केली. मुलींसाठी निव्वळ शिक्षणच नाही तर सैनिक शिक्षण देण्याचा त्यांचा प्रयत्न दूरगामी होता. ते एक द्रष्टे व्यक्तिमत्त्व होते.

ते म्हणाले, महाराणी छत्रपती ताराराणी यांच्या कर्तृत्वाची प्रेरणा घेऊन सध्या वायुसेनेत महिला वैमानिक झाल्या आहेत. स्त्री हीच मूर्ती आणि कीर्ती आहे. ती ऊर्जेचे केंद्र असल्यानेच तिला आपण देवीचे रुप दिले आहे.

यानंतर 'डॉ. व्ही. टी. पाटील : व्यक्ती व कार्य' या विषयावर प्राचार्य डॉ. पाटणे म्हणाले, बहुजन समाजाच्या उद्धारासाठी चंदनासारखे झिजलेले डॉ. व्ही. टी. पाटील हे माणसातले देव होते. त्यांनी शिक्षण, सहकार, पर्यटन, राजकारण अशा विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाची आणि दातृत्वाची मुद्रा उमटविली. शाहू महाराजांच्या मानवतावादी विचारांना त्यांनी महाराणी ताराराणी विद्यापीठ व मौनी विद्यापीठाच्या स्थापनेतून कृतीचे अधिष्ठान दिले.

वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विद्यार्थी कल्याण निधीला आर्थिक मदत देणार असल्याचे फुटाणे यांनी सांगितले.

उषाराजे हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी स्मृतिगीत सादर केले. डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी प्रास्ताविक केले. वक्त्यांची ओळख डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी करून दिली. पी. आर. मंडलिक यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. जयसिंग सावंत यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)

Scanned by CamScanner